ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल – gkmsparbhani@gmail.com

## कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - २९/२०२०-२१ शुक्रवार, दिनांक - १०.०७.२०२०

### मराठवाडयाकरीता चालु आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक ११ ते १५ जुलै, २०२०)

| हवामान घटक | जिल्हयाचे नांव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | औरंगाबाद | बीड | हिंगोली | जालना | लातुर | नांदेड | उस्मानाबाद | परभणी |
| पाऊस (मिमी) | ५७.० | ५४.० | ६४.० | ७२.० | ४५.० | ८०.० | ४८.० | ७३.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३०.० | ३२.०-३३.० | ३०.०-३३.० | ३०.०-३२.० | ३२.०-३३.० | ३३.०-३४.० | २९.०-३०.० | ३२.०-३३.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.० | २०.० | २३.०-२४.० | २३.०-२५.० | २२.० | २३.० | २२.० | २३.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ - ८७ | ७९ - ८६ | ७९ - ८८ | ८२ - ८९ | ८१ - ८७ | ७९ - ८८ | ८१ - ८७ | ७८ - ८६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५५ - ६८ | ५५ - ६९ | ५५ - ७२ | ५७ - ७३ | ५७ - ६७ | ५४ - ६७ | ५५ - ६७ | ५४ - ६७ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | १२ - १७ | १५ - १९ | १२ - १८ | १३ - १६ | १३ - १७ | ११ - १६ | १३ - १७ | १३ - १७ |
| वा-याची दिशा | नैऋत्य ते पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम |

मराठवाडयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. विशेषत: दिनांक १० जुलै रोजी लातुर व उस्मानाबाद जिल्हा वगळता तर दिनांक ११ जुलै रोजी औरंगाबाद जिल्हा वगळता तुरळक ठिकाणी वादळी वारा व विजांच्या कडाक्यासह मध्यम ते जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. मराठवाडयात ज्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाला नसेल (हिंगोली जिल्हा : वसमत जालना जिल्हा : जालना, उस्मानाबाद जिल्हा : लोहारा, परांडा, तुळजापूर, उमरगा व परभणी जिल्हा : गंगाखेड) येथे पेरणीयोग्य (७५ मीमी) पेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी.

विस्तारीत अंदाजानूसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक १५ ते २१ जुलै २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे.

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
|---|---|---|
| सोयाबीन | वाढीची अवस्था | सोयाबीन पिकावरील खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी प्रोफेनाफॉस ५० % ४०० मिली किंवा थायामिथॉझाम १२.६ % + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ९.५ % (संयुक्त किटकनाशक) ५० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. सोयाबीन पिक पिवळे पडत असल्यास (क्लोरोसीस) याच्या व्यवस्थापनासाठी शेतात वाफसा स्थिती राहील अशी व्यवस्था करावी व नंतर ०.५ ते १ % फेरससल्फेटची किंवा ईडीटीए चेलेटेड मिक्स मायक्रोन्युट्रिएंट ग्रेड (II) ५०० ग्रॅम प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पेरणी योग्य पाऊस न झालेल्या ठिकाणी पेरणी योग्य पाऊस (७५ मिमीपेक्षा जास्त) झाल्यानंतर सोयाबीन पिकाची पेरणी करण्यास हरकत नाही. पेरणीसाठी आंतरपीक पध्दतीचा अवलंब करवा. पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| खरीप ज्वारी | वाढीची अवस्था | खरीप ज्वारी पिकावरील लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी थायामिथोक्झाम १२.६ टक्के + लॅमडा सायहॅलोथ्रीन ९.५ झेडसी ५ मिली किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास वरील किटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. पुढील काळात खरीप ज्वारी पिकाची पेरणी करू नये. पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| बाजरी | वाढीची अवस्था / पेरणी | पेरणी योग्य पाऊस न झालेल्या ठिकाणी पेरणी योग्य पाऊस (७५ मिमीपेक्षा जास्त) झाल्यानंतर बाजरी पिकाची पेरणी करण्यास हरकत नाही. बाजरी पिकामध्ये बाजरी + तुर हे आंतरपीक २:१ किंवा ४:२ या प्रमाणात घ्यावे. पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |

पुढील पानावर........

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
|---|---|---|
| ऊस | वाढीची अवस्था | सदय परिस्थितीत ब-याच ठिकाणी ऊस पिकात हुमणीच्या अळया दिसून येत आहेत याच्या व्यवस्थापनासाठी मेटाराईझीयम ॲनोसोप्ली या जैवीक बुरशीचा ४ किलो (जास्त प्रादुर्भाव असल्यास १० किलो) प्रती एकर जमिनीतून वापर करावा. तसेच काही ठिकाणी लागवड केलेल्या ऊस पिकात जास्त काळ पाणी साचुन राहणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| हळद | वाढीची अवस्था | सदय परिस्थितीत ब-याच ठिकाणी हळद पिकात हुमणीच्या अळया दिसून येत आहेत याच्या व्यवस्थापनासाठी मेटाराईझीयम ॲनोसोप्ली या जैवीक बुरशीचा ४ किलो (जास्त प्रादुर्भाव असल्यास १० किलो) प्रती एकर जमिनीतून वापर करावा. तसेच काही ठिकाणी लागवड केलेल्या हळद पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| संत्रा /मोसंबी | वाढीची अवस्था | संत्रा / मोसंबी फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| डाळिंब | वाढीची अवस्था | डाळिंब फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| चिकू | वाढीची अवस्था | चिकू फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| फुल शेती | काढणीस / वाढीची अवस्था | काढणीस तयार असलेल्या मोगरा फुलांची काढणी करून घ्यावी. नवीन लागवड केलेल्या फुलपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| भाजीपाला | काढणीस / वाढीची अवस्था | नवीन लागवड केलेल्या भाजीपाला पिकात तुट भरून काढावी. नवीन लागवड केलेल्या भाजीपाला पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| चारा पिके | लागवड / पेरणी | चारा पिकाची लागवड न केलेल्या शेतक-यांनी पाऊस झाल्यानंतर जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून वापसा येताच ज्वारी, बाजरी, मका ईत्यादी चारा पिकाची लागवड करावी. |
| तुती रेशीम उदयोग | | तुती बागेस मर रोग किंवा मुळ कुजव्या रोगाची लागण होऊ नये म्हणून लागवडीच्या अगोदर बेणे ३० मिनीटे ०.०२ टक्के बाव्हेस्टीन (कार्बेन्डेझीम) या बुनशीनाशकाच्या द्रावणात बुडवूनच शेतात लागवड करावी. लागवड केलेल्या जुन्या तुती बागेत १-२ वर्षानंतर मर रोग दिसुन आल्यास जमिनीतून झाडाच्या मुळा लगत ४ किलो बायोमीक्स जैवीक बुरशीनाशक दयावे. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पुढील दोन दिवसात तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजा, पावसाचा अंदाज लक्षात घेता पशुधनास पाऊस सुरू असताना उघडयावर बांधू किंवा चरावयास सोडू नये. पावसाळयात गोठयाची स्वच्छता, मलमूत्राचा निचरा व गोठयात कोठेही दलदल होणार नाही, याची काळजी घ्यावी. पशूंची पचनक्रिया बिघडून आजारी पडण्याचे व पोटफुगीची अवस्था टाळण्यासाठी खादय म्हणून (१००%) हिरवा चारा देण्याचे टाळावे. हिरव्या चा-यासोबतच पशुखादयात सुयोग्य प्रमाणात कोरडा चाराही असावा. पावसाळयात पशूंना /वासरांना हगवण लागली असल्यास पशुवैदयकाच्या सल्ल्याने त्वरीत औषधोपचार करून घ्यावा. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्‌यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. | | |


मुख्य प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी